रचना संसद
RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र. २६/ डीटीई /२९७/२०२४ १२ मार्च, २०२४

प्रति
मा.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

**विषय : वित्तीय वर्ष २०२२-२०२३ अखेर पर्यंत विभागीय कार्यालयाने केलेल्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान आमच्या महाविद्यालयास उपलब्ध करुन देण्याबाबत.**

संदर्भ : १. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे पत्र क्र. २/ विकामुं/तंशि/लेखा/मुल्यनि/ॲकॅडमी/२०२२-२३/११२७, दि. ११ मार्च २०२४ अन्वये प्राप्त झालेला सहायक अनुदानाचा मूल्यनिर्धारण अहवाल.
२.आमच्या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र. २६/ डीटीई /३५१ /२०२३, दि.२२ फेब्रुवारी,२०२३

मा.महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात सहसंचालक विभागीय कार्यालय यांनी ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अशासकीय अनुदानित संस्थेचे वर्ष २०२२-२३ अखेरपर्यंतचे अनुदान मूल्यनिर्धारण सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेल्या जमाखर्च पत्रक व ताळेबंदानुसार तपासून व पडताळणी करुन संस्थेस येणे बाकी असलेल्या रु.३,४१,९४,२२८/- (रुपये तीन कोटी एक्केचाळीस लाख चौऱ्याण्णव हजार दोनशे अठ्ठावीस फक्त) एवढी सहायक अनुदानाची रक्कम **कमी देण्यात आल्याचे** उपरोक्त संदर्भ पत्र क्र. १ नुसार प्रमाणित केलेले आहे, त्याची प्रत माहितीस्तव सोबत जोडली आहे.

संस्थेने पत्र क्र.२६/डीटीई/३५१/२०२३, दि.२२ फेब्रुवारी २०२३ अन्वये संस्थेस येणे बाकी असलेल्या अनुदानाबाबत दि.२२ फेब्रुवारी, २०२३ रोजी पाठपुरावा केला होता.

सदर बाबतीत मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे संस्थेमार्फत योग्य तो पाठपुरावा करण्यात आला होता. आमच्या महाविद्यालयाच्या पालक संस्थेचे अध्यक्ष श्री.विश्वजीत डहाणूकर यांनी संबंधितांची प्रत्यक्ष भेट घेऊन आमची आर्थिक अडचण त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

काल दि.११ मार्च २०२४ रोजी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांची भेट घेऊन आमच्या संस्थेस भेडसावणाऱ्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करुन त्यांना निवेदन सादर केले होते. त्याची प्रत आम्ही आपल्या मार्फत मा.प्रधान सचिव यांचेकडे सादर करण्यासाठी याआधीच हस्तांतरीत केलेली आहे.

मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी कालच्या भेटीत संस्थेस दि.३१ मार्च २०२३ अखेर पर्यंत मूल्यनिर्धारण अहवालानुसार कमी प्राप्त झालेले आवर्ती सहाय्यक अनुदान रु. ३,४१,९४,२२८/- मार्च २०२४ अखेर पर्यंत जास्तीत जास्त उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिलेले आहे.

आपण सदर बाबतीत आमची अडचण समजून घेऊन शासनस्तरावर आमच्या अनुज्ञेय अनुदानाची रक्कम लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी ही नम्र विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

ACADEMY OF ARCHITECTURE * MUMBAI-25 *

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर

12-03-2024
तंत्र शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग,
पोस्ट बॉक्स क्र. १९६७, धोबी तलाव,
मुंबई-४०० ००१.

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

फोन नं.२६४७ ४८९२
टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई५१.

क्र. २/विकामुं/तंशि/लेखा/मुल्यनिर्धारण/२०२२-२३/ॲकेडमी/ ११२८ दिनांक : 01 MAR 2024

प्रति,
मा.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.४००००१

विषय :-वित्तीय वर्ष २०२२-२३ या कालावधीत संस्थेस दिलेल्या सहाय्यक अनुदानाचा मुल्यनिर्धारण अहवाल

संदर्भ:-१.मा.संचालनालयाचे पत्र क्र.७/तंशिस/मुल्यनिर्धारण/२०२२-२३/४७६ दि.२६/०४/२०२३
२.या कार्यालयाचे पत्र क्र.३/विकामुं/लेखा/मुल्यनिर्धारण अहवाल/२०२३/१८८४ दि.०४/०५/२०२३
३.संस्थेचे पत्र क्र.२८/डिटीई-आरओ/५८/२०२३ दि.२७/०६/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये विभागातील अशासकीय अनुदानीत संस्थेंचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे मुल्यनिर्धारण अहवाल मा.तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांना सादर करण्याचे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये विभागातील सर्व अशासकीय अनुदानीत संस्थांना आर्थिक वर्ष २०२२-२३ चे मुल्यनिर्धारण करण्याकरीता सनदी लेखापालाने प्रमाणित केलेली जमा खर्चमेळाची प्रत,जमा खर्चाच्या संस्थेतील नोंदवहया,प्रमाणके,देयके,बँक पासबुक,वेतनदेयके,मागील दोन वर्षात प्राप्त झालेल्या सहाय्यक अनुदानाचे आदेशाच्या प्रतीसह या कार्यालयास विहित वेळापत्रकानुसार हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये प्राचार्य,अकेडमी ऑफ आर्किटेक्चर,मुंबई संस्थेने कागदपत्रे सादर केलेली आहेत. सनदी लेखापालाकडून प्रमाणित जमाखर्चमेळाचे विवरणपत्र प्राप्त न झाल्यामुळे संस्थेने सादर केलेल्या जमा खर्चाच्या आकडेवारी व सादर केलेल्या माहितीवरुन सदरचे मुल्यनिर्धारण अहवाल तयार करण्यात आलेला आहे.संस्थेने प्रमाणित जमाखर्चमेळ विवरणपत्राची प्रत सादर केल्यास त्याप्रमाणे सुधारीत मुल्यनिर्धारण अहवाल निर्गमीत करण्यात येईल.

सदर संस्थेचे मुल्यनिर्धारण करताना उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई शासन निर्णय क्र.सीईटी-११७७/१३/३१६२६/(३३४०)/आयएक्स- दि.१८/०५/१९७८च्या शासन निर्णयान्वये सहाय्यक अनुदानीसाठी ग्राहय धरण्यात आलेल्या वेतन व वेतनेत्तर बाबी मान्य करण्यात आलेल्या आहेत.

सदर मुल्यनिर्धारणावरुन असे दिसुन येते की, वित्तीय वर्ष २०२२-२०२३ अखेरपर्यंत सदरहु संस्थेस रु.३,४१,९४,२२८/- (अक्षरी रु.तीन कोटी एक्केचाळीस लाख चव्व-यानऊ हजार दोनशे अठावीस फक्त ) एवढी आवर्ती सहाय्यक अनुदानाची रक्कम कमी देण्यात आलेली आहे.सदरची **कमी** देण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामधे समायोजित करण्यात येईल.अशी आपणास विनंती करण्यात येत आहे

सोबत :-१.मुल्यनिर्धारण अहवाल २०२२-२३

ACADEMY OF ABCHITECTURE
Inward File No. : 28/DTE RO
File Name : RO. 2345
12 MAR 2024
Received by : Suhas Pathak
Attention by :
Replied on :

आपला

(प्रमोद अं.नाईक )
सहसंचालक ,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत :-१. प्राचार्य,ॲकेडमी ऑफ आर्किटेक्चर,मुंबई
२. कार्यालय अधिकारी,कार्यासन क्र.७,मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र.२६/डीटीई/२७७/२०२४ दि . २९ फेब्रुवारी, २०२४

प्रति
मा.प्रधान सचिव
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
४ था मजला, मंत्रालय ॲनेक्स (विस्तारित इमारत)
मुंबई ४०० ०३२

लिपिक (नो. शा.)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.

द्वारा

मा.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय
३,महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

**विषय: ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अनुदानित महाविद्यालयास भेडसावणा-या विविध अडीअडचणींकडे लक्ष वेधणेबाबत. तसेच मा.मंत्री महोदयांचे ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग) मार्गदर्शन व मंजुरी मिळणे बाबत.**

मा.महोदय,

प्रस्तावना :-

ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर हे एक खाजगी व्यवस्थापनाचे प्रतिथयश वास्तुशास्त्र पदवी महाविद्यालय असून ते अनुदानित तत्त्वावर चालवण्यात येते. त्याची स्थापना ही सन १९५५ साली झाली होती. त्या काळी फक्त सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे एकमेव वास्तुशास्त्र महाविद्यालय होते.

संस्थेने गेल्या ६८ वर्षात वास्तुशास्त्र अभ्यासक्रमात आपला एक वेगळाच दबदबा निर्माण केला असून संस्थेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रात आपले योगदान व व्यावसायिक ठसा उमटवला असून त्यांची नावे व त्यांनी केलेले काम आपल्या अवलोकनार्थ सादर करत आहोत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | हफिज कॉन्ट्रॅक्टर | ८ | अजय नाहर | १४ | संदिप शिक्रे |
| २ | नौशिर तलाठी | ९ | चिराग जैन | १५ | संजय पूरी |
| ३ | रुमी श्रॉफ | १० | दिपक ठक्कर | १६ | समिप पडोरा |
| ४ | अशोक कोरगांवकर | ११ | कल्पक भावे | १७ | मनोज दहिसरीया |
| ५ | रमेश एडवणकर | १२ | निनाद टिपणीस | १८ | इतर अनेक माजी विद्यार्थी |
| ६ | अभिन अलिम चंदानी | १३ | राहुल काद्री | | |

७ राजीव मिश्रा - प्राचार्य, सर ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालय व प्रभारी कला संचालक

या माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या शिरेपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांनी वास्तुविशारद झाल्यापासून व्यावसायिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कामांचे महाविद्यालयाने डायमंड ज्युबली वर्षानिमित्ताने (वर्ष १९५५-२०१५) छापलेली माहिती पुस्तिका आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडली आहे. ती कृपया पहावी.

..२

लघुलेखक
तंत्र शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य मुंबई

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

संदर्भ क्र.२६/डीटीई/२७७ /२०२४  दि. २९ फेब्रुवारी, २०२४

ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अनुदानित संस्थेशी निगडित प्रलंबित मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१) रिक्त शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्याबाबत तसेच बरेच वर्षे प्रलंबित असलेला शिक्षकेतर पदांचा आढावा लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत सविस्तर माहिती खालील प्रमाणे :-

दि.७ डिसेंबर २०१९ रोजीच्या शासननिर्णयानुसार शिक्षकीय पदांचा आढावा पूर्ण झाला असून आमच्या महाविद्यालयास एकूण २२ शिक्षकीय पदे मंजूर झाली आहेत. (१ पद प्राचार्य , २ पदे - प्राध्यापक, ४ पदे - सहयोगी प्राध्यापक, १५ पदे - सहाय्यक प्राध्यापक) सदर पदांपैकी १४ पदे मागील वर्षापर्यंत रिक्त होती. त्यातील ५० टक्के पदे भरण्याबाबत परवानगी मिळाली होती परंतू निवड समितीची बैठक दि १८ एप्रिल, २०२३ रोजी होऊन त्याची शिफारस तंत्रशिक्षण संचालनालय व मुंबई विद्यापीठ यांचेकडे नियुक्तीच्या अंतीम मान्यतेसाठी अजूनही प्रलंबित आहे. तसेच उर्वरित ५० टक्के पदे (एकूण ८ ) उर्वरित भरण्यास लवकरात लवकर परवानगी मिळणेबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे. सद्य स्थितीत रिक्त शिक्षकीय पदांचा कार्यभार हा तासिकेवरील अभ्यागत अधिव्याख्याते व कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांमार्फत हाताळला जातो. परंतू त्यासाठी पुरेसे वेतनेत्तर अनुदान उपलब्ध करुन दिले जात नाही ही आमची विवंचना आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या एकूण १४ शिक्षकेतर पदांपैकी सध्या फक्त खालील ६ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत व इतर ८ शिक्षकेतर पदे रिक्त आहेत.

| कार्यरत पदांचा तपशिल | |
|---|---|
| १ पद | अधीक्षक |
| १ पद | वीजतंत्री |
| २ पदे | शिपाई |
| २ पदे | पहारेकरी |
| ६ पदे | एकूण भरलेली पदे |

| रिक्त पदांचा तपशिल | |
|---|---|
| १ पद | लघुटंकलेखक |
| १ पद | वरिष्ठ लिपिक |
| १ पद | कनिष्ठ लिपिक |
| १ पद | सहाय्यक ग्रथपाल |
| १ पद | ग्रंथालय परिचर |
| २ पदे | शिपाई |
| १ पद | पहारेकरी |
| ८ पदे | एकूण रिक्त पदे |

तंत्रशिक्षण संचालनालयाने शिक्षकेतर पदांचा आढावा पूर्ण केल्याचे समजते व तो प्रस्ताव अंतीम मान्यतेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे सादर केल्याचे समजते. याबाबतीत संबंधितांना योग्य ते निर्देश यावेत ही नम्र विनंती.

२) HTE सेवार्थ प्रणालीतील त्रुटी दूर करणे बाबत.

महाराष्ट्र शासनाद्वारे अनुदानित महाविद्यालयांसाठी वेतनासाठीचे अनुदान वितरण करण्याची सेवार्थ प्रणाली सन डिसेंबर २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आली.

शासनातर्फे या महाविद्यालयास सुरवाती पासून अनुदान प्राप्त् असून HTE सेवार्थ प्रणाली सन डिसेंबर २०१५ पासून अंमलात आणल्यापासून संस्थेस वेतनासाठी ९० % दराने अनुदान उपलब्ध करुन दिले जात आहे. दि.२१ ऑगस्ट २०१५

..३

च्या जाचक शासननिर्णयानुसार सेवार्थ प्रणाली लागू करतांना १० टक्के वेतन व्यवस्थापनाने करण्याची जी अट टाकण्यात आली होती ती १९७८ च्या शासननिर्णयातील नियमांच्या विसंगत असून त्यातील मान्य खर्चाचे १०० % (वेतनाचे) परिणामी वेतनाचे दायित्व हे शासनाचेच आहे. त्यामुळे सदर शासननिर्णयास शुद्धीपत्र काढून ही त्रुटी सुधारित करता येऊ शकेल.

**३) आर्थिक वर्ष २०२१ - २२ अखेरीस प्रलंबित असलेले रुपये रु. २,८३,३०,७४१/- हे अनुदान उपलब्ध करून देणे बाबत.**

संस्थेस आर्थिक वर्ष २०२१ - २२ अखेरीस येणे बाकी असलेले रु. २,८३,३०,७४१/- हे अनुदान लवकरात लवकर उपलब्ध करणेबाबत ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर ह्या खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित महाविद्यालयाने सातत्याने पाठपुरावा केला असून मागील दहा वर्षाचा अनुदान येणे बाकी असल्याचा गोषवारा संचालक तंत्र शिक्षण संचालनालय यांना सादर केलेला आहे. याबाबतीत सकारात्मक प्रतिसाद मिळाणे अपेक्षित आहे. **त्याची प्रत माहितीसाठी सोबत जोडली आहे.**

**४) अनुदानाचे मूल्यनिर्धारण:-**

अनुदानचे मूल्यनिर्धारण निकषानुसार दरवर्षी संस्थेचे अनुदानाचे सर्वेक्षण हिशेब तपासनीसांच्या अहवालासह प्राप्त झालेल्या खर्च-जमापत्रक व ताळेबंदानुसार करुन सहसंचालक विभागीय कार्यालय,मुंबई यांचेतर्फे अनुदानाचे मूल्यनिर्धारण करण्यात येते. शासनाच्या अनुदान सूत्रानुसार जे निकष आहेत त्यानुसार संस्थेस येणे बाकी असलेली अनुदानाची रक्कम प्रमाणित करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सहसंचालक, विभागीय कार्यालय यांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२१-२२ अखेरीस संस्थेस २,८३,३०,७४१/- इतकी रक्कम येणे बाकी असून ती लवकरात लवकर उपलब्ध करुन न दिल्याने एका प्रतिथयश संस्थेला दैनंदिन कामकाजात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे याकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. सदर बाबतीत मा.मंत्री महोदयांनी आमच्या दि. २९ नोव्हेंबर २०२३ च्या विनंती पत्रावर दि.१५ डिसेंबर २०२३ रोजी स्वाक्षरी करुन त्याबाबतची सद्य स्थिती लवकरात लवकर सादर करावीत असे निर्देश आपल्या कार्यालयाला (मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग) सादर केलेले आहेत. (सदर पत्राची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे)

**५) वेतनेतर खर्चासाठी व आकस्मिक खर्चाच्या कमाल मर्यादेत वाढ करणेबाबत**

सन १९७८ पासून अनुदानित संस्थांसाठी पारित केलेल्या निकषांमध्ये गेली तब्बल ४५ वर्षे उलटून गेली तरी आकस्मिक खर्चाच्या अनुदानासाठी नेमून दिलेली कमाल मर्यादा आजतागायत वाढलेली नाही. वेतनेत्तर खर्चासाठी प्रति विद्यार्थी रु.७००/- इतकीच कमाल मर्यादा आहे. त्यात कित्येक वर्षात वाढ झालेली नाही. तसेच पुस्तक खरेदीसाठी प्रति विद्यार्थी रु.७०/- इतकी पदवी अभ्यासक्रमाची मर्यादा असल्याने ती ही अतिशय तुटपुंजी आहे. सध्याची महागाई विचारात घेता या दरात आजकाल काहीच उपलब्ध होत नाही. व्यावसायिक वास्तुशास्त्र अभ्यासक्रमासाठी क्रमिक पुस्तके नसल्याने विविध विषयांवर उपलब्ध असलेली खर्चीक पुस्तके काऊंसिल ऑफ आर्किटेक्चरच्या मानका प्रमाणकानुसार विकत घ्यावी लागतात. त्यासाठी अंदाजे ३ ते ४ लाखाची पुस्तके दरवर्षी खरेदी काऊंसिल ऑफ आर्किटेक्चरच्या निकषानुसार करणे अपेक्षित आहे. परंतू त्यासाठी खर्चाची मर्यादा व त्यासाठी कोणताही वेगळा निधी उपलब्ध करुन दिला जात नाही ही आमची व्यथा आहे.

..४

ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद MUMBAI

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.



**६) शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्कात वाढ होणेबाबत:-**

गेल्या २० वर्षात वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमात सन २००३-२००४ पासून कोणत्याही स्वरुपाची फी वाढ (शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्कात झालेली नाही.) त्यातुलनेत अभियांत्रिकी अभ्यासक्रमात सन २००३-०४ पासून भरघोस फी वाढ झाली असून सन २०१४-१५ मध्ये पुन:श्च् फी वाढीस मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे सद्य स्थितीत या अभियांत्रिकी अनुदानित महाविद्यालयांची फी अंदाजे रु.८५०००/- इतकी झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम चालविणारी दोनच खाजगी व्यवस्थानाची अनुदानित महाविद्यालय अस्तित्वात असून त्यांच्या फी वाढीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या तुलनेत वास्तुशास्त्र अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्का रु.१५५००/- इतकेच असून त्यात वाढ होण्याबाबत सविस्तर प्रस्ताव दि.२२ जानेवारी २०२४ आम्ही आमच्या महाविद्यालयातर्फे मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच विभागीय कार्यालय मुंबई व आपल्या कार्यालयाकडे सविनय सादर केला आहे.

वास्तुशास्त्र महाविद्यालय अनुदानित तत्त्वावर चालविणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. याकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. उपरोक्त अडीअडचणी सोडविण्यासाठी माननीय संचालकांनी योग्य ती शिफारस करावी व याबाबतीत मा.मंत्री महोदयांकडे मान्यतेसाठीची शिफारस करावी ही नम्र विनंती.

आपण आपल्या (माननीय प्रधान सचिव यांच्या दालनात) दालनात एका संयुक्त बैठकीचे आयोजन केल्यास व त्याबाबतीत उत्तम तोडगे सुचविल्यास आम्ही आपले शतश: ऋणी राहू. आपण आमची विनंती मान्य करुन भेटीची संधी उपलब्ध करुन द्याल असा विश्वास आहे.

कळावे.
आपला विश्वासू,

ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद MUMBAI-25.

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

## मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याबरोबर चर्चा करावयाचे मुद्दे

१) ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर मधील रिक्त शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्याबाबत तसेच बरेच वर्षे प्रलंबित असलेला शिक्षकेतर पदांचा आढावा लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत.

- ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चरमध्ये २२ शिक्षकीय पदे (१- प्राचार्य, २ - प्राध्यापक, ४ - सहयोगी प्राध्यापक व १५ - सहाय्यक प्राध्यापक) अशी पदे मंजूर असून त्यातील फक्त १० पदे भरलेली आहेत. (१- प्राचार्य, १ - प्राध्यापक, २ - सहयोगी प्राध्यापक व ६ - सहाय्यक प्राध्यापक)
- रिक्त शिक्षकीय पदांचा कार्यभार तासिकेवरील अभ्यागत अध्यापकांमार्फत भागवावा लागतो परंतू अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात हा खर्च वेतनेत्तर अनुदानातून उपलब्ध् करणे अपेक्षित असून त्यासाठीचे पुरेसे अनुदान उपलब्ध् करुन दिले जात नाही ही आमची व्यथा आहे.
- तसेच १४ मजूर शिक्षकेतर पदांपैकी फक्त ६ पदे भरलेली आहेत. (१ - कार्यालयीन अधीक्षक, १ - वीजतंत्री, २ - शिपाई व २ - पहारेकरी) इतर ८ पदे रिक्त आहेत. परिणामी प्रशासकीय कामकाज हाताळणे अवघड झाले आहे.
- शिक्षकेतर पदांचा आढावा गेले बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहे. त्याबाबत निर्णय व्हावा व रिक्त पदे भरण्याबाबत मान्यता मिळावी.

२) HTE सेवार्थ प्रणालीतील त्रुटी दूर करणे बाबत.

- HTE सेवार्थ प्रणालीद्वारे सन डिसेंबर २०१५ पासून ९० टक्के वेतन अदा केले जात आहे.

३) आर्थिक वर्ष २०२१ - २२ अखेरीस प्रलंबित असलेले रुपये रु. २,८३,३०,७४१/- हे अनुदान उपलब्ध करून देणे बाबत.

- विभागीय कार्यालयाच्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या संस्थेस रुपये २,८३,३०,७४१/- इतके अनुदान येणे बाकी असल्याचे प्रमाणित केले आहे.

४) आर्थिक वर्ष २०२२ - २३ अखेरीस प्रलंबित असलेले रुपये रु. ३,४१,९४,२२८/- हे अनुदान उपलब्ध करून देणे बाबत.

- विभागीय कार्यालयाच्या मूल्यनिर्धारण अहवालाच्या आधीन राहून ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या संस्थेस रुपये ३,४१,९४,२२८/- इतके अनुदान येणे बाकी असल्याचे दिसून येत आहे.

५) अनुदानाचे मूल्यनिर्धारण व वेतनेतर आणि आकस्मिक खर्चाच्या कमाल मर्यादेत वाढ करणेबाबत

- अनुदान मूल्यनिर्धारणासाठी दि.१८.५.१९७८ च्या शासननिर्णयातील निकष व खर्चाची कमाल मर्यादा विचारात घेतली जात आहे त्यात गेल्या ४५ वर्षामध्ये सुधारणा झालेली नाही.

६) शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्कात वाढ होणेबाबत

- गेल्या २० वर्षात वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्कात वाढ झालेली नाही. सद्य परिस्थिती बघता सदर वाढ होणे गरजेचे आहे.

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य, ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर
1/2/2024

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

दि .१ फेब्रुवारी, २०२४

**ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अनुदानित महाविद्यालयास भेडसावणा-या विविध अडीअडचणींकडे मा.मंत्री महोदयांचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त बैठकीसाठी सादर करावयाचे चर्चेचे मुद्दे :**

- ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर हे एक खाजगी व्यवस्थापनाचे अनुदानित प्रतिथयश वास्तुशास्त्र पदवी महाविद्यालय असून त्याची स्थापना ही सन १९५५ साली झाली होती. त्या काळी फक्त सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे एकमेव वास्तुशास्त्र महाविद्यालय होते.

  संस्थेने गेल्या ६८ वर्षात वास्तुशास्त्र अभ्यासक्रमात आपला दबदबा निर्माण केला असून संस्थेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रात आपले योगदान व व्यावसायिक ठसा उमटवला असून त्यांची नावे आपल्या अवलोकनार्थ सादर करत आहोत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | हफिज कॉन्ट्रॅक्टर | ७ | राजीव मिश्रा | १३ | राहुल काद्री |
| २ | नौशिर तलाठी | ८ | अजय नाहर | १४ | संदिप शिक्रे |
| ३ | रुमी श्रॉफ | ९ | चिराग जैन | १५ | संजय पूरी |
| ४ | अशोक कोरगांवकर | १० | दिपक ठक्क्र | १६ | समिप पडोरा |
| ५ | रमेश एडवणकर | ११ | कल्पक भावे | १७ | मनोज दहिसरीया |
| ६ | अभिन अलिम चंदानी | १२ | निनाद टिपणीस | १८ | इतर अनेक माजी विद्यार्थी |

या माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या शिरेपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्यांनी वास्तुविशारद झाल्यापासून व्यावसायिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कामांचे महाविद्यालयाने डायमंड ज्युबली वर्षानिमित्ताने (वर्ष १९५५-२०१५) छापलेली माहिती पुस्तिका आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

- रिक्त् शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्याबाबत तसेच शिक्षकेतर पदांचा आढावा लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत.

  शिक्षकीय व शिक्षकेतर पदांच्या आढाव्यानुसार दि.१.४.२००४ च्या शासननिर्णयानुसार आमच्या महाविद्यालयास खालील पदे मंजूर होती.

| | |
|---|---|
| १ पद - प्राचार्य | १ पद - अधीक्षक |
| २ पदे - प्राध्यापक | १ पद - लघुटंकलेखक |
| ६ पदे - सहयोगी प्राध्यापक | १ पद - कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक |
| १० पदे - सहाय्यक प्राध्यापक | १ पद - वरिष्ठ लिपिक |
| ============== | १ पद - सहाय्यक ग्रंथपाल |
| १९ एकूण शिक्षकीय पदे | १ पद - वीजतंत्री |
| ============== | १ पद - ग्रंथालय परिचर |
| | ४ पदे - शिपाई |
| | ३ पदे - पहारेकरी |
| | ================ |
| | १४ एकूण शिक्षकेतर पदे |

ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद MUMBAI-25

..२



278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

दरम्यान दि.७ डिसेंबर २०१९ रोजी शिक्षकीय पदांचा आढावा पूर्ण झाला असून आमच्या महाविद्यालयास एकुण २२ शिक्षकीय पदे मंजूर झाली आहेत. (१ पद प्राचार्य , २ पदे - प्राध्यापक, ४ पदे - सहयोगी प्राध्यापक, १५ पदे - सहाय्यक प्राध्यापक) सदर पदांपैकी १४ पदे मागील वर्षापर्यंत रिक्त होती. त्यातील ५० टक्के पदे भरण्याबाबत परवानगी मिळाली होती परंतू निवड समितीची बैठक दि १८ एप्रिल, २०२३ रोजी होऊन त्याची शिफारस तंत्रशिक्षण संचालनालय व मुंबई विद्यापीठ यांचेकडे नियुक्तीच्या अंतीम मान्यतेसाठी अजूनही प्रलंबित आहे. तसेच उर्वरित ५० टक्के पदे भरण्यास लवकरात लवकर परवानगी मिळणेबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या एकूण १४ शिक्षकेतर पदांपैकी सध्या फक्त खालील ६ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत व इतर ८ शिक्षकेतर पदे रिक्त आहेत.

१ पद - अधीक्षक
१ पद - वीजतंत्री
२ पदे - शिपाई
२ पदे - पहारेकरी

तंत्रशिक्षण संचालनालयाने शिक्षकेतर पदांचा आढावा पूर्ण केल्याचे समजते व तो प्रस्ताव अंतीम मान्यतेसाठी उच्च् व तंत्रशिक्षण विभागाकडे सादर केल्याचे समजते. याबाबतीत संबंधितांना योग्य ते निर्देश यावेत ही नम्र विनंती.

- अनुदानाचे वितरण करण्याची सेवार्थ प्रणाली व संस्थेस येणे बाकी असलेले अनुदान लवकरात लवकर वितरित करणेबाबत:

ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर ही खाजगी व्यवस्थापनाचे अनुदानित महाविद्यालय असून शासनातर्फे या महाविद्यालयास सुरवाती पासून अनुदान प्राप्त् असून HTE सेवार्थ प्रणाली सन २०१५ पासून अंमलात आणल्यापासून संस्थेस वेतनासाठी ९० % दराने अनुदान उपलब्ध करुन दिले जात आहे. दि.२१ ऑगस्ट २०१५ च्या जाचक शासननिर्णयानुसार सेवार्थ प्रणाली लागू करतांना १० टक्के वेतन व्यवस्थापनाने करण्याची जी अट टाकण्यात आली होती ती १९७८ च्या शासननिर्णयातील नियमांच्या विसंगत असून त्यातील मान्य खर्चाचे १०० % (वेतनाचे) दायित्व् हे शासनाचेच आहे. त्यामुळे सदर शासननिर्णयास शुद्धीपत्र काढून ही त्रुटी सुधारित करता येऊ शकेल.

अनुदान मूल्यनिर्धारणाच्या निकषानुसार दरवर्षी संस्थेचे अनुदानाचे सर्वेक्षण खर्च-जमापत्रक व ताळेबंदानुसार करुन सहसंचालक विभागीय कार्यालय,मुंबई यांचेतर्फे मूल्यनिर्धारण करण्यात येते. शासनाच्या अनुदान सूत्रानुसार जे निकष आहेत त्यानुसार संस्थेस येणे बाकी असलेली अनुदानाची रक्कम प्रमाणित करुन त्याबाबतचा सविस्त्र् अहवाल सहसंचालक,विभागीय कार्यालय यांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाकडे सादर केलेला आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२१-२२ अखेरीस संस्थेस २,८३,३०,७४१/- इतकी रक्कम येणे बाकी असून ती लवकरात लवकर उपलब्ध करुन न दिल्याने एका प्रतिथयश संस्थेच्या दैनंदिन कामकाजात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे याकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. सदर बाबतीत मा.मंत्री महोदयांनी आमच्या विनंती पत्रावर स्वाक्षरी करुन त्याबाबतची सद्य स्थिती लवकरात लवकर सादर करावीत असे निर्देश मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना दि.१५ डिसेंबर २०२३ रोजी दिलेले आहेत.

..३

28/RO/AOA FEes Revision Prastav Points 29 JAN 2024



ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.



- **वेतनेत्त्र खर्चासाठी व आकस्मिक खर्चाच्या कमाल मर्यादेत वाढ करणेबाबत**

  सन १९७८ पासून अनुदानित संस्थांसाठी पारित केलेल्या निकषांमध्ये गेली तब्बल ४५ वर्षे उलटून गेली तरी आकस्मिक खर्चाच्या अनुदानासाठी नेमून दिलेली कमाल मर्यादा आजतागायत वाढलेली नाही. वेतनेत्तर खर्चासाठी प्रति विद्यार्थी रु.७००/- इतकीच कमाल मर्यादा आहे. त्यात कित्येक वर्षात वाढ झालेली नाही. तसेच पुस्तक खरेदीसाठी प्रति विद्यार्थी रु.७०/- इतकी पदवी अभ्यासक्रमाची मर्यादा असल्याने ती ही अतिशय तुटपुंजी आहे. सध्याची महागाई विचारात घेता या दरात आजकाल काहीच उपलब्ध होत नाही. व्यावसायिक वास्तुशास्त्र अभ्यासक्रमासाठी क्रमिक पुस्तके नसल्याने विविध विषयांवर उपलब्ध असलेली खर्चीक पुस्तके काऊंसिल ऑफ आर्किटेक्चरच्या मानका प्रमाणकानुसार विकत घ्यावी लागतात. त्यासाठी अंदाजे ३ ते ४ लाखाची पुस्तके दरवर्षी खरेदी करणे काऊंसिल ऑफ आर्किटेक्चरच्या निकषानुसार करणे अपेक्षित आहे. परंतू त्यासाठी खर्चाची मर्यादा व त्यासाठी कोणताही वेगळा निधी उपलब्ध् करुन दिला जात नाही ही आमची व्यथा आहे.

- **शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्कात वाढ होणेबाबत**

  गेल्या २० वर्षात वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमात सन २००३-२००४ पासून कोणत्याही स्वरुपाची फी वाढ झालेली नाही. त्यातुलनेत अभियांत्रिकी अभ्यासक्रमात सन २००३-०४ पासून भरघोस फी वाढ झाली असून सन २०१४-१५ मध्ये पुन:श्च् फी वाढीस मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे सद्य स्थितीत या अभियांत्रिकी अनुदानित महाविद्यालयांची फी अंदाजे रु.८५०००/- इतकी झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम चालविणारी दोनच खाजगी व्यवस्थानाची अनुदानित महाविद्यालय अस्तित्वात असून त्यांच्या फी वाढीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या तुलनेत वास्तुशास्त्र अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्का रु.१५५००/- इतकेच असून त्यात वाढ होण्याबाबत सविस्त्र प्रस्ताव दि.२२ जानेवारी २०२४ आम्ही आमच्या महाविद्यालयातर्फे मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच आपल्या कार्यालयाकडे सविनय सादर केला आहे.

**वास्तुशास्त्र महाविद्यालय अनुदानित तत्त्वावर चालविणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. याकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. उपरोक्त् अडीअडचणी सोडविण्यासाठी आपणआपल्या दालनात एका संयुक्त बैठकीचे आयोजन केल्यास व त्याबाबतीत उत्त्म तोडगा सुचविल्यास आम्ही आपले शतश: ऋणी राहू. आपण विनंती मान्य करुन भेटीची संधी उपलब्ध् करुन द्यावी ही नम्र विनंती.**

कळावे.
आपला विश्वासू,

ACADEMY OF ARCHITECTURE
रचना संसद
MUMBAI-25

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर



278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

1 1 JAN 2024

संदर्भ क्र. २६/डिटिई/२३७/२०२४ दि. ०८.०१.२०२४

माननीय प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय अनेक्स, ४ था मजला
मुंबई - ४०००३२

12/01/2024
Higher & technical edu. dept.

तंत्र शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग,
पोस्ट बॉक्स क्र १९६७, धोबी तलाव,
मुंबई-४०० ००१.

विषय :– वित्तीय वर्ष २०२१-२२ अखेरीस ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम चालविणा-या महाविद्यालयास अनुज्ञेय असलेले रुपये २,८३,३०७४१/- इतके अनुदान लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत

संदर्भ : १. माननीय श्री चंद्रकांत दादा पाटील उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना सादर केलेले पत्र क्र. २६/मंत्रालय/१८०/२०२३ दि. २९ नोव्हेंबर २०२३ अन्वये सादर केलेल्या विनंती पत्रावर दि. १५.१२.२०२३ रोजी पत्र ईऑफीस क्र. ६४७१३८१ अन्वये मंत्री महोदयांच्या सहीने आपल्या कार्यालयास अग्रेषित केलेले पत्र कृपया पहावे.( प्रत सोबत जोडली आहे)

२. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई यांनी संस्थेचे मूल्यनिर्धारण करुन वित्तीय वर्ष २०२१-२२ या कालावधी अंती अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय यांना सादर केलेल्या दि. ७.१०.२०२२ च्या शिफारस पत्राची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे

माननीय महोदय

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाविद्यालयाने उपरोक्त संदर्भांकित क्र. १ च्या पत्रान्वये संस्थेस अनुज्ञेय असलेले अनुदान लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठीचा विनंती अर्ज नागपूर अधिवेशन काळात सादर केला होता. त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या पत्राची प्रत मा. मंत्री महोदयाने स्वाक्षरी करुन आपल्या कार्यालयाकडे **" त्वरित तपासून सादर करावे "** असा अभिप्राय नोंदवून अग्रेषित केलेले आहे. त्याची प्रत आपल्या अवलोकनार्थ पुन:श्च सादर करीत आहोत. (परिशिष्ठ -१)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो की, रचना संसद ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर ही वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम चालवणारे अनुदानित महाविद्यालय असून सन १९५५ साली त्याची स्थापना झालेली आहे. हया महाविद्यालयातर्फे अतिशय उत्कृष्ट असे वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाचे व्यावसायिक शिक्षण दिले जाते . हा अभ्यासक्रम १२ वी नंतर ५ वर्षाचा पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रम असून संपूर्ण महाराष्ट्रात फक्त २ खाजगी महाविद्यालयामध्ये अनुक्रमे ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर (६०+६) विद्यार्थी प्रवेश क्षमता व बीकेपीएस वास्तुशास्त्र महाविद्यालय पुणे (२० + २ ) विद्यार्थी प्रवेश क्षमता हे अनुदानित तत्वावर हा पदवी अभ्यासक्रम चालवितात परंतू आमच्या महाविद्यालयास भेडसावणा-या आर्थिक अडचणींकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. सेवार्थ प्रणाली डिसेंबर २०१५ ला लागू झाल्या पासून महाविद्यालयास अनुज्ञेय असलेल्या मान्य खर्चासाठीचे पुरेसे अनुदान प्राप्त न झाल्याने १९७८ शासन निर्णयातील तरतूदींनुसार केलेल्या आमच्या महाविद्यालयाच्या

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र. २६/डिटिई/२३७/२०२४ दि. ०८.०१.२०२४

अनुदान मूल्यनिर्धारण अहवालाप्रमाणे वित्तीय वर्ष २०२१-२२ अखेर रुपये २,८३,३०७४१/- इतके अनुदान उपलब्ध करुन दिले गेलेले नाही ही बाब आम्ही आपणांस निदर्शनास आणू इच्छितो ही रक्कम वर्षागणित वाढत असून अनुदानित वास्तुशास्त्र पदवी महाविद्यालय चालविणे दिवसेदिवस कठिण होत चालले आहे. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई यांच्या शिफारस पत्राची प्रत **(परिशिष्ठ -२)** आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

मागील १० वर्षात आमच्या महाविद्यालयास १९७८ च्या शासननिर्णयातील तरतूदींनुसार करण्यात आलेल्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेल्या अनुदानाचा वर्षनिहाय गोषवारा **(परिशिष्ठ -३)** आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडलेला आहे. सदर तक्त्याचे अवलोकन केल्यास आपल्या असे निदर्शनास येईल की गेल्या १० वर्षात टप्प्याटप्प्याने मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले अनुदान प्राप्त न झाल्याने आमच्या आर्थिक विवंचनेत दिवसेदिवस वाढ झाली असून दरवर्षी पुरवणी मागणी व्दारे **(परिशिष्ठ -४)** यासाठीचा प्रस्ताव संचालनालयामार्फत सादर करुनही ही बाब अजूनही प्रलंबित आहे व अनुदान अद्याप प्राप्त होणे बाकी आहे.

माननीय मंत्री महोदयांनी सदर बाबतीत आम्हाला अनुज्ञेय असलेले अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मकता दर्शविली असल्याने सदर बाबतीत संबधित कागदपत्रे मंत्री महोदयांकडे सादर लवकरात लवकर सादर करता यावी यासाठी उपरोक्त संबधित कागदपत्रे आम्ही आपल्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करीत आहोत.

कळावे

आपला विश्वासू

(सुरेश म सिंग)
प्राचार्य
ॲकडमी ऑफ आर्किटेक्चर

संपर्कासाठी :- सुहास पाठक - कार्यालयीन अधीक्षक - 9930046169

प्रत: १. माननीय श्री चंद्रकांत दादा पाटील मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग म.रा. यांना माहितीस्तव सविनय सादर
२. माननीय संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर
३. माननीय सहसंचालक विभागीय कार्यालय यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

11 JAN 2024
लिपिक
मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य
मंत्री कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

परिशिष्ट १

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI
FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

मा. मंत्री, उ.व तंत्र शि./वस्त्रो./सं.कार्य
यांचे कार्यालय
ई-ऑफीस क्र. : 6471381
दिनांक : 15-12-2023

संदर्भ क्र. २६/मंत्रालय/ १८० /२०२३

दि. २९.११.२०२३

प्रधान सचिव (उच्च व तंत्र) यांनी तपासून सादर करावे
(C.B.Patil)

(चंद्रकांत (दादा) पाटील)
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग
संसदीय कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

माननीय श्री चंद्रकांत दादा पाटील
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री
मंत्रालय अनेक्स, ३रा मजला,
मुंबई ४०००३२.

विषय :- वित्तिय वर्ष २०२१-२२ अखेरीस अनुज्ञेय असलेले रूपये २,८३,३०,७५४/- इतके अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत.

माननीय महोदय,

उपरोक्त विषया संदर्भात आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो की, रचना संसदची ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर हि वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम चालवणारी संस्था असून सन १९५५ पासून हिची स्थापन करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे हे अनुदानित महाविद्यालय असून गेल्या अनेक वर्षापासून अतिशय नावा रुपाला आलेले आहे.

वेतनासाठी शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सेवार्थ प्रणाली डिसेंबर २०१५ पासून अंमलात आणल्यापासून संस्थेला शासन निर्णयातील मान्य खर्चासाठी मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर व पुरेसे न मिळाल्याने संस्थेची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट झाली असून डबघाईला आलेली आहे. मासिक वेतनासाठी सुद्धा ९० टक्के दराने सेवार्थ प्रणाली द्वारे तंत्र शिक्षण संचालनालयाकडून अनुदान प्राप्त होते तेही वेळेवर मिळत नाही. अनुदान सुत्रानुसार मान्य खर्चाच्या बाबी विचारात घेऊन सहसंचालक, विभागीय कार्यालयाने केलेल्या मुल्यनिर्धारणानुसार संस्थेस जे अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे ते सहसंचालक विभागीय कार्यालयाने तपासून व पडताळणी करून वेळोवेळी प्रमाणितही केलेले आहे.

दिवसे दिवस खर्चाचे प्रमाण वाढत असून दैनंदिन खर्च भागविणे अतिशय कठीण झाले आहे. वेतनेत्तर खर्चाच्या बाबींचे निकष हे १९७८ च्या शासन निर्णयानुसारच लागू केले जातात त्यात सद्य: स्थितीतील खर्चाच्या बाबी विचारात घेऊन बदल करणे आवश्यक आहे, ही बाब आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

गेल्या तीन चार वर्षा पासून पुरवणी मागणीद्वारे सविस्तर प्रस्ताव सादर करूनही अनुज्ञेय असलेले वेतन व वेतनेतर अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, यास्तव सदरहू पत्राद्वारे आम्ही आमच्या अडचणी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. आपण आपल्या स्तरावर योग्य ते निर्देश संबंधितांना द्यावेत ही नम्र विनंती .

कळावे,

आपला स्नेहांकित

ACADEMY OF ARCHITECTURE MUMBAI

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर
प्रभादेवी मुंबई २५.

प्रत: प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

RACHANA SANSAD'S
**ACADEMY OF ARCHITECTURE**
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ पत्र क्र.२८/डीटीई-आरओ/ ५८ /२०२३ दि. २७ जून २०२३

प्रति
मा.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

30/06/2023
Joint Director, Technical Education, Regional Office, World Bank Project Building, Government Polytechnic Campus, Aliyawar Jung Road, Bandra (East), Mumbai - 400 051.

**विषय : अनुदानित संस्थांचे वित्तीय वर्ष २०२२-२३ चे मूल्यनिर्धारण अहवाल सादर करणेबाबत.**
संदर्भ : १. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.३/विकामुं/तंशि/लेखा-२/२०२३/२४३४ दि.२६ जून, २०२३
२. आमच्या कार्यालयाचे पत्र क्र.२८/डीटीई-आरओ/२९/२०२३, दि.४ मे २०२३

मा.महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपले संदर्भांकित क्र.१ चे पत्र प्राप्त झाले असून सदर विषयाच्या अनुशंगाने आम्ही संदर्भांकित क्रमांक २ च्या दि.४ मे, २०२३ च्या पत्रान्वये आमच्या महाविद्यालयाचे जमा व खर्च पत्रक तयार करण्यासाठी तसेच हिशोब तपासनीसांकडून त्याची तपासणी पूर्ण करण्यासाठी प्राथम्य क्रमाने हे काम हाती घेतले आहे असे वेळापत्रकातील दिनांकास (८ मे २०२३ रोजी) हस्तबटवडे सादर केले होते. सदर पत्राची प्रत सोबत जोडत आहोत.

आम्ही नमूद केल्याप्रमाणे हिशोब तपासनीसांनी प्राथमिक तपासण्या पूर्ण केल्या असून खर्च व जमापत्रक व ताळेबंद प्रमाणित करण्याची प्रक्रिया अंतीम टप्प्यात आलेली आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत आपणांस यथावकाश सादर करु. हा अहवाल अंतीम करतांना आमची पालक संस्था यांचेसुद्धा ऑडीट पूर्णहोणे अपेक्षित आहे. ते कामही सध्या युद्धपातळीवर सुरु आहे. अंतीम अहवालाच्या आधीन राहून आम्ही आमचा स्वयं मूल्यनिर्धारण अहवाल तयार करुन आपल्या अवलोकनार्थ व प्राथमिक तपासणीसाठी सादर करीत आहोत.

वेतनावरील खर्च, इतर आकस्मिक खर्च, मासिके/नियतकालिके व पुस्तकांवरील खर्च हा किमान मर्यादेच्या आधीन असल्यामुळे त्याची संबंधित सर्व कागदपत्रे आपल्या तपासणी सूचीच्या यादीनुसार सादर करीत आहोत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजूर केलेले इमारत भाडे याबाबतचे पत्र आपल्या अवलोकनार्थ सादर करीत आहोत. त्याची पूर्व तपासणी करुन मूल्यनिर्धारणाचे काम हाती घेण्यासाठी आम्ही आपणांस योग्य ते सहाय्य करु व मूल्यनिर्धारणाची नस्ती आपणांस या पत्रासोबत सादर करीत आहोत जेणेकरुन हिशोबतपासनीसांच्या अंतीम अहवालाच्या आधीन राहून हे काम पूर्ण होऊ शकेल.

वित्तीय आर्थिक वर्ष २०२१-२२ अखेरीस सहसंचालक, विभागीय कार्यालय,मुंबई यांनी मंजूर केलेल्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार आमच्या महाविद्यालयास रु.२,८३,३०,७४१/- इतकी अनुदानाची रक्कम संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडून येणे बाकी असल्याचे प्रमाणित केलेले आहे तसेच महाविद्यालयाने ही रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत



278, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025. Tel. : 2430 1024 / 2431 0807 Fax 2430 1724
Email: contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

ACADEMY OF ARCHITECTURE MUMBAI-25

संदर्भ पत्र क्र.२८/डीटीई-आरओ/ ५८ /२०२३ :: २ :: दि. २७ जून २०२३

सातत्याने पाठपुरावा करतांना पुरवणी मागणीचा प्रस्ताव सर्व संयुक्तीक कागदपत्रांसह मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे सहसंचालक, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या शिफारस पत्रानुसार सादर केला होता. या दोन्ही पत्रांच्या प्रती आपल्या अवलोकनार्थ सादर करीत आहोत.

वित्तीय आर्थिक वर्ष २०२२-२३ अंती स्वयंमूल्यनिर्धारण अहवालानुसार मान्य खर्चांच्या बाबी व इतर कमाल मर्यादा विचारात घेऊन तयार केलेला मूल्यनिर्धारण अहवालाचे निरिक्षण केले असता १८ मे १९७८ च्या शासननिर्णयातील तरतूदीनुसार आमच्या महाविद्यालयास येणे बाकी असलेली रक्कम रु.३,४१,९४,२२८/- अशी दिसत असून सदर रक्कम लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यासाठी आपण संचालक तंत्रशिक्षण यांच्याकडे आपला अंतीम मूल्यनिर्धारण अहवाल तयार झाल्यानंतर योग्य ती शिफारस करावी ही नम्र विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य
ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र. २६/ डीटीई /३५१ /२०२३ — २२ फेब्रुवारी, २०२३

२४/०२/२०२३
नोंदणी विभाग प्रमुख
तंत्र शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१.

प्रति
मा.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग
मुंबई - ४०० ००१

**विषय : वित्तीय वर्ष २०२१-२०२२ अखेर पर्यंत विभागीय कार्यालयाने केलेल्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान आमच्या महाविद्यालयास उपलब्ध करुन देण्याबाबत.**

संदर्भ : १. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे पत्र क्र. २/ विकामुं/तंशि/लेखा/मुल्यनि/ॲकॅडमी/२०२१-२२ /३२३४, दि. २२.०९.२०२२ अन्वये प्राप्त झालेला सहायक अनुदानाचा मूल्यनिर्धारण अहवाल.

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण यांना मा.सहसंचालक, विभागीय कार्यालय यांनी लिहिलेले दि.२७ ऑक्टोबर २०२२ चे पुरवणी मागणीसाठी संस्थेने सादर केलेल्या दि.१० ऑक्टोबरच्या प्रस्तावास प्राप्त झालेले शिफारस पत्र.

मा.महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात सहसंचालक विभागीय कार्यालय यांनी ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अशासकीय अनुदानित संस्थेचे वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंतचे अनुदान मूल्यनिर्धारण सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेल्या जमाखर्च पत्रक व ताळेबंदानुसार तपासून व पडताळणी करुन संस्थेस येणे बाकी असलेल्या रु.२,८३,३०,७४१/- (रुपये दोन कोटी त्र्याऐंशी लाख तीस हजार सातशे एक्केचाळीस फक्त) एवढी सहायक अनुदानाची रक्कम कमी देण्यात आल्याचे उपरोक्त संदर्भ पत्र क्र. १ नुसार प्रमाणित केलेले आहे.

संस्थेने पत्र क्र.२६/डीटीई/२३५/२०२२, दि.१० ऑक्टोबर २०२२ अन्वये अनुदानाच्या पुरवणी मागणीसाठी सविस्तर प्रस्ताव संयुक्तीक सर्व कागदपत्रांसह (परिशिष्ठ २६-एकूण पृष्ठ क्र.४१५) विभागीय कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावाची पडताळणी करुन संस्थेस येणे बाकी असलेल्या रकमेची पुरवणी मागणी संचालनालयाकडे सादर करण्यासाठी विभागीय कार्यालयाने उपरोक्त संदर्भ पत्र क्र.२ नुसार याबाबतीत शिफारस केली होती.

शासनाकडे सदर बाबतीत आमच्या संस्थेचा प्रस्ताव सादर केला असल्यास त्याची प्रत आम्हास उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन मंत्रालय स्तरावर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचे मार्फत योग्य तो पाठपुरावा करता येईल. आमच्या महाविद्यालयाच्या पालक संस्थेचे अध्यक्ष श्री.विश्वजीत डहाणूकर यांनी मा.मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आमची आर्थिक अडचण त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. सदर बैठकीस तत्कालिन संचालक मा.श्री अभय वाघ हे ही उपस्थित होते. संस्थेस येणे बाकी असलेली रक्कम लवकरात लवकर अदा करण्यात यावी याबाबत त्यांनी उपस्थितांना निर्देश दिलेले होते. परंतू आजतागायत संस्थेस कोणतेही वेतनेत्तर अनुदान किंवा येणे बाकी असलेल्या अनुदानाच्या थकबाकीची रक्कम उपलब्ध झालेली नाही.

ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चरच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या बैठकीत मा.अध्यक्षांनी याबाबतचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीकोनातून मंत्रालयातील मंत्री महोदयांच्या कार्यालयात एका बैठकीचे आयोजन करण्याबाबत सूचित केले असल्याने

..२

ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद MUMBAI-25

278,Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai, 400 025, Tel : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email : contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

RACHANA SANSAD'S
**ACADEMY OF ARCHITECTURE**
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र. २६/ डीटीई /३५१ /२०२३  २२ फेब्रुवारी, २०२३

तंत्रशिक्षण संचालनालय स्तरावर आमच्या महाविद्यालयाच्याबाबतीत काय पत्रव्यवहार झाला आहे याची शहानिशा करण्यासाठी हे पत्र सादर करीत आहोत.

संपूर्ण महाराष्ट्रात दोनच अनुदानित वास्तुशास्त्र महाविद्यालये असून रचना संसद ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर (६० विद्यार्थी प्रवेश क्षमता) हे त्यातील एक अतिशय नावाजलेले महाविद्यालय मुंबईत असून बी.के.पी.एस.कॉलज ऑफ आर्किटेक्चर हे पुणे स्थित महाविद्यालय २० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचा अनुदानित अभ्यासक्रम चालवित आहेत. मुंबई येथील सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालय आहे. त्याचा दैनंदिन खर्च मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात येतो.

उपरोक्त पार्श्वभूमीचा विचार करता वास्तुशास्त्र अभ्यासक्रम चालविणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. वेतनासाठीचे अनुदान वाटप करतांना ९० टक्के दराने वेतनासाठीची रक्कम सेवार्थप्रणालीद्वारे वितरित होते व ती ही वेळेवर होत नाही. वेतनेत्तर अनुदानासाठी कमाल मर्यादेचे जे निकष आहेत ते सन १९७८ च्या शासननिर्णयानुसार अंमलात आणले जातात. त्यानुसार केलेले मूल्यनिर्धारण विचारात घेऊन संस्थेस अनुज्ञेय असलेल्या अनुदानाची तरतूद शासनस्तरावर करुन ते उपलब्ध करुन देण्यासाठी संचालनालय स्तरावर प्रयत्न होणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षक व विद्यार्थी गुणोत्तराचे पालन काऊंसिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणानुसार करणे क्रमप्राप्त असले तरी रिक्तपदे भरण्याबाबतही शासनस्तरावर उदासिनता दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता काही शिक्षकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक तासिका तत्वार करुन कार्यभार साधावा लागतो. परंतू गेल्या ३ ते ४ वर्षात वेतनेत्तर अनुदान अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध झाल्याने त्याचा बोजा व्यवस्थापनावर पडत आहे. वेतनेत्तर अनुदानातून हा खर्च भागविण्यासाठी वित्तीय तरतूद केली असतांनासुद्धा म्हणावे तितके अनुदान यासाठी उपलब्ध करुन दिले जात नाही परिणामी संस्थेची आर्थिक कुचंबणा होत आहे. याबाबत मंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटून काहीतरी तोडगा काढण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय मंडळातील सदस्य याबाबतीत पाठपुरावा करणार आहेत.

आपण सदर बाबतीत आमची अडचण समजून घेऊन शासनस्तरावर आमच्या अनुदानाच्या पुरवणी मागणीबाबत पत्रव्यवहार केला असल्यास त्याची प्रत सदर बैठकीत सादर करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी ही नम्र विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

ACADEMY OF ARCHITECTURE रचना संसद MUMBAI-25.

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर

278, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025. Tel. : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email: contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

O/C

RACHANA SANSAD'S
ACADEMY OF ARCHITECTURE
MUMBAI FOUNDED IN 1955, AFFILIATED TO UNIVERSITY OF MUMBAI, RECOGNISED BY COUNCIL OF ARCHITECTURE AND GOVERNMENT OF MAHARASHTRA.

संदर्भ क्र.२६ / डीटीई / २९३ / २०२२ दि. १९ डिसेंबर, २०२२

प्रति,
मा.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.
३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

विषय : **वित्तीय वर्ष २०२१-२२ या कालावधीतील विभागीय कार्यालयाने केलेल्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान पुरवणी मागणीतील तरतूदीनुसार उपलब्ध करुन देणेबाबत.**

संदर्भ : सहसंचालक, विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.२/विकामुं/ तंशि/लेखा/मूल्यनि/ॲकॅडमी/२०२२/३५८३ दि. २७ ऑक्टोबर २०२२ अन्वये करण्यात आलेले शिफारस.

मा.महोदय,

उपरोक्त विषया संदर्भात आमच्या महाविद्यालयाने दि.१०.१०.२०२२ अन्वये ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर या अनुदानित महाविद्यालयास मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन मिळण्यासाठी संयुक्तीक सर्व कागदपत्रांसह सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची सहसंचालक, विभागीय कार्यालय, मुंबई यांनी सखोल पडताळणी करुन संस्थेस अनुज्ञेय असलेले रु.२,८३,३०,७४१/- (अक्षरी रुपये दोन कोटी त्र्याऐंशी लाख तीस हजार सातशे एक्केचाळीस फक्त) इतकी रक्कम सहायक अनुदानापोटी उपलब्ध करुन देण्यासाठीची शिफारस आपल्या कार्यालयाकडे केली होती त्याची प्रत सोबत जोडत आहोत.

ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर ही मुंबईतील एकमेव अशासकयी अनुदानित संस्था असून सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे विद्यापीठांतर्गत चालविले जाणारे अनुदानित महाविद्यालय आहे. संस्थेस गेल्या ३ वर्षात अतिशय तुटपुंजे (नगण्य) वेतनेत्तर अनुदान उपलब्ध झालेले आहे. त्याचा गोषवारा सदर पत्रात नमूद केलेला आहे. संस्थेच्या व्यवस्थापनानेसुद्धा गेल्या ८ वर्षात रु.१,३१,८४,०००/- इतकी रक्कम खर्चासाठी उपलब्ध करुन दिली असल्याने ती खर्च जमा पत्रकात विचारात घेतलेली नाही. परिणामी शासनावरचा अभ्यागत अध्यापकांच्या मानधनावर होणारा खर्च त्याप्रमाणात कमी दर्शविण्यात आला आहे हे येथे प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते.

काऊंसिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणकानुसार शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर हे १ : १० (शिक्षक : विद्यार्थी संख्या) प्रमाणात असणे क्रमप्राप्त असल्याने संस्थेतील रिक्त शिक्षकीय पदांचा कार्यभार हाताळण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अध्यापकांची नियुक्ती संस्थेस करावी लागते. परंतू सेवार्थ प्रणालीमध्ये तासिकेवरील अध्यापकांचा मानधनाचा खर्च हा वेतनेत्तर खर्चातील अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये विचारात घेतला जात असल्याने व वेतनेत्तर अनुदान गेल्या अनेक वर्षापासून कमी उपलब्ध होत असल्याने संस्थेस येणे बाकी असलेली रक्कम वाढीस लागली आहे. त्याचा तौलनिक तक्ता परिशिष्ट क्र.२'१ नुसार प्रस्तावासोबत जोडलेला आहे त्याची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे. आमची आर्थिक निकड लक्षात घेऊन पुरवणीमागणीद्वारे सादर केलेला प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करावा व अनुज्ञेय असलेले अनुदान लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावे अन्यथा महाविद्यालय चालवणे दिवसेंदिवस दुरापास्त होत चालले आहे याची कृपया नोंद घ्यावी.

आपण आमच्या विनंतीचा प्राधान्यक्रमाने विचार कराल असा विश्वास आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

(सुरेश म. सिंग)
प्राचार्य - ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर

20/12/2022

278, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025. Tel. : 2430 1024 / 2431 0807 Fax : 2430 1724
Email: contact@aoamumbai.in website : www.aoamumbai.in

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.
टेलीफॅक्स नं.२६४७ ४८९२, २६४७ १६१९
E-Mail : jtdirrom@gmail.com Web : www.jdteromumbai.com


क्र.२/विकामुं/तंशि/लेखा/मुल्यनि/ॲकेडमी/२०२२/३५१३

दिनांक : २७/१


ACADEMY OF ARCHITECTURE
Inward File No. : 28 RO-243
File Name : RO-28
22 NOV 2022
Received by : Mandar Amle
Attention by : Principal AOA
Replied on :


प्रति,
मा.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**विषय : वित्तीय वर्ष २०२१-२०२२ या कालावधीतील मूल्यनिर्धारण अहवालानुसार अनुज्ञेय असलेले सहायक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.**

संदर्भ : १. प्राचार्य,ॲकेडमी ऑफ आर्किटेक्चर,मुंबई यांचे पत्र क्र.२६/डीटीई/२२५/२०२२, दि.१० /१०/ २०२२.
२. संस्थेचे पत्र क्र.२६/डिटीई/२२५/२०२२ दि.२८/०९/२०२२.
३. कार्यालयांचे पत्र क्र. २/ विकामुं/तंशि/लेखा/मुल्यनि/ॲकडमी/२०२१-२२/३२३४, दि. २२.०९.२०२२.
४. मा.संचालक, तंत्रशिक्षण यांना मा.सहसंचालक, विभागीय कार्यालय यांनी लिहिलेले दि.१ फेब्रुवारी २०२१.

मा. महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, ॲकडमी ऑफ आर्किटेक्चर या अशासकीय अनुदानित संस्थेचे आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चे अनुदान मूल्यनिर्धारण सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेल्या जमाखर्च पत्रक व ताळेबंद यानुसार तपासून व पडताळणी करुन लेखाविषयक बाबींचे मूल्यनिर्धारण केलेले असून सदरचा मुल्यनिर्धारण अहवाल संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये निर्गमीत केलेला आहे.

उपरोक्त संदर्भ पत्र ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासननिर्णय क्र.सीईटी-१०७७/१३१६२६/(३३४०)/आयएक्स दि.१८.५.१९७८ अन्वये वित्तीय वर्ष २०२१-२०२२ अखेरपर्यंतच्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार ॲकडमी ऑफ आर्किटेक्चर या अनुदानित संस्थेस रुपये २,८३,३०,७४१/- (अक्षरी रु. दोन कोटी त्र्याऐंशी लाख तीस हजार सातशे एक्केचाळीस फक्त) एवढी आवर्ती सहायक अनुदानाची रक्कम **कमी** देण्यात आली आहे असे प्रमाणित केलेले आहे व सदर अनुदानाची रक्कम सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात समायोजित करण्यात येईल असे नमूद केलेले आहे. (संदर्भ पत्र क्र.३ ची प्रत **परिशिष्ठ १** )

माहे डिसेंबर २०१५ मध्ये अनुदानित संस्थांना सेवार्थ प्रणाली सुरु झाल्यापासून उपरोक्त संदर्भ पत्र क्र. २ नुसार वित्तीय वर्ष २०१६-२०१७ पासून जे आवर्ती वार्षिक अनुदान संस्थेस अनुज्ञेय होते त्या तुलनेत दरवर्षी अतिशय कमी रक्कम वेतनेत्तर खर्चासाठी संस्थेस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचा गोषवारा संस्थेने सादर केलेला आहे. (या पत्राची प्रत **परिशिष्ठ २** )

माहे डिसेंबर २०१५ पासून सेवार्थ प्रणाली सुरु होण्यापूर्वी तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे वार्षिक आवर्ती अनुदान ४ हप्त्यांमध्ये विभागून संस्थेस प्राप्त होत असे. दरवर्षी मार्च महिन्यात ४ माही व ८ माही अंदाजपत्रकातील तरतूदीचा गोषवारा विचारात घेऊन व संस्थानिहाय केलेल्या अनुदान मूल्यनिर्धारणाचा सर्वकष आढावा घेऊन संस्थेस देणे बाकी असलेल्या अनुदानाच्या संभाव्य रक्कमेची तरतूद पुरवणी मागणीद्वारे शासनाकडे नोंदवली जात असे व ती मंजूर झाल्यावर अनुदानाचा ५ वा हप्ता संस्थेस अदा केला जात असे.
संदर्भ क्र. २६/ डीटीई / २३५/२०२२ दिनांक १० ऑक्टाबर, २०२२

